# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/06/2023 (गुरूवार) दुपार

---

### रेती चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा खैरी नाला येथे दिनांक १२/०६/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ यांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजा खैरी नाला येथे अवैधरित्या रेती उत्खनन होत आहे. या माहिती वरून नमुद घटनास्थळी जावुन यातील आरोपी नामे– **१) सागर भुते रा. खापा २) अक्षय लखपती, रा. खापा ३) हर्शल मोहटे, रा. खापा ४) सुरज डोर्हीफोड रा. खापा ५) शुभम हिंगे रा. खापा ६) विक्की मारोतकर रा. खापा ७) विजय मडके रा. खापा ८) निखील भांडीले रा. ढकारा ९) पिंटु सुरकार रा. खापा १०) जितु जावरेकर रा. खापा** यांनी खैरी नाला येथुन रेती चोरून नेण्याच्या उद्देशाने खैरी नाल्यालगत एकुण ०७ रेतीचे ढिगारे २८ ब्रॉस रेती किंमती अंदाजे ७२,८००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीकल्लु हसन कनोजे, वय ५७ वर्ष रा. मंडळ अधिकारी खापा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशि संतोश परतेती ब. नं. २१६३ पोस्टे खापा मो. नं. ९०२१६०६८६३ हे करीत आहे.

### अवैध रेती वाहतुकीवर
### –: पोलीस स्टेशन कन्हान नागपूर जिल्हा ग्रामीण ची कार्यवाही :–

पोलीस स्टेशन कन्हान नागपूर ग्रामीण येथील पोलीस स्टाफ दिनांक १४/०६/२०२३ चे ०५.१५ वा. ते ०६. ०० वा. दरम्यान कन्हान उपविभागात अवैध धंदयांवर आढा घालणेकामी पोस्टे कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असता खात्रीशिर माहिती मिळाली की, सिंगारदिप गावातील कन्हान नदीच्या पात्रात ट्रॅक्टर ट्रॉलीच्या साहाय्याने अवैधरित्या विनापरवाना रेती ची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून सिंगारदिप गावातील, कन्हान नदीच्या पात्रातून आरोपीतांनी दोन ट्रॅक्टर मध्ये ट्रॉली सह एक ब्रास रेती किंमत २२००/– १) एक निळया रंगाचा सोनालिका सिकंदर कंपनीचा MH40 CA 6670 असलेला मुंडा ५,००,०००/–रू. २) ट्रॅक्टरला लागुन असलेली हिरव्या रंगाची ट्राली ज्याची लांबी रूदी उंची १० ' ०५ '०२ ३) ट्रॉली मधील एक ब्रास रेती ४) एक निळया रंगाचा सोनालिका सिंकदर कंपनीचा MH40BJ 1327 असलेला मुंडा ५) ट्रॅक्टरला लागून असलेली हिरव्या रंगाची ट्रॉली ज्याची लांबी ' रूदी ' उंची १० ' ०५ '०२ ६) ट्राली मधील ५ घमेले रेती भरलेली ७) दोन शेंदरी रंगाचे प्लास्टीक घमेले ८) दोन प्लास्टीकचे दांडे असलेले लोखंडी फावडे प्रत्येकी १५०/– रू. असा एकुण १२,०२,९००/–रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोशि/अश्विन गजभिये ब. नं. ७९८ यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एएसआय गणेश पाल मो. नं. ९५५२५१२६८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर